# कविकुलगुरु–कालिदास–संस्कृत–विश्वविद्यालयः, महाराष्ट्रम्

**रामटेक कार्यालय** : – प्रशासकीय भवन, मौदा रोड, रामटेक, जिल्हा–नागपूर – 441 106

**नागपूर कार्यालय** :– महाराष्ट्र गांधी स्मारक निधी संस्था, कस्तुरबा भवन, ज्ञानेश्वर मंदिराजवळ, बजाज नगर, नागपूर

Ramtek Ph No. (07114) 256476, Telefax 255549 Nagpur Ph.No. (0712) 2248094


जा. क्र. ककासंवि/नाम/2010/613 दिनांक :– 19.10.2010

प्रति,

**अध्यक्ष/सचिव,**

सत्र 2011–12 पासून नवीन महाविद्यालयाच्या संलग्नीकरणासाठी अर्ज करणाऱ्या सर्व संबंधित संस्था.

**विषय – शैक्षणिक सत्र 2011–12 पासून नवीन महाविद्यालयाने (व्यावसायिक/पारंपारिक) मंजूरीसाठी अर्ज मागविण्याच्या कार्यपद्धतीबाबत शासनाने पाठविलेल्या पत्रानुसार कार्यवाहीबाबत....**

महोदय,

वरील संदर्भित महाराष्ट्र शासनाच्या पत्रान्वये शैक्षणिक सत्र 2011–12 पासून नवीन महाविद्यालये (व्यावसायिक/ पारंपारिक) मंजूरीसाठी अर्ज मागविण्याच्या कार्यपद्धतीबाबत शासनाने कार्यवाही करण्यास विद्यापीठांना सूचित केले आहे. त्यानुसार आपणास खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे.

1) नवीन महाविद्यालयांना मान्यता देण्यासाठी वार्षिक योजनेनुसार विद्यापीठाकडून वृत्तपत्रांमध्ये जाहिरात देण्यात आली आहे.

2) नवीन महाविद्यालय सुरु करण्यास इच्छुक संस्थांनी दि. 31 ऑक्टोबर पर्यन्त प्रथम अनुकूलता पत्र L.O.I. (Letter of Intent) करिता विद्यापीठाकडे अर्ज करावा. प्रत्येक अर्जावर **Application for Letter of Intent** असे शीर्षक द्यावे. त्याची एक प्रत संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना पाठवावी.

3) इच्छुक संस्थांकडून अर्ज स्वीकारताना अर्जात भरण्यात आलेली माहिती व त्यासोबत जोडणे आवश्यक असलेल्या कागदपत्रांची तपासणी केल्यानंतर आवश्यक बाबींची पूर्तता करणारे अर्जच फक्त विद्यापीठाकडून स्वीकारण्यात येतील.

4) विद्यापीठाकडे प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करण्याकरिता एक पडताळणी समिती तयार करण्यात येईल.

5) प्राप्त अर्जांची व कागदपत्रांची पडताळणी करुन समिती तिचा अहवाल 15 नोव्हेंबर पर्यन्त कुलगुरुंना सादर करेल.

6) समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर 15 डिसेंबर पर्यन्त पात्र संस्थांना कुलगुरुंकडून अनुकूलता पत्र L.O.I. (Letter of Intent) देण्यात येईल. तसेच L.O.I. नाकारण्यात आलेल्या संस्थांना त्याबाबतची कारणे कळविण्यात येतील.

7) कुलगुरुंकडून प्राप्त झालेल्या L.O.I. ची मुदत 3 वर्षाची असेल.

8) अनुकूलता (L.O.I.) नाकारण्यात आलेल्या संस्थांनी 15 जानेवारी पर्यन्त त्रुटींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

9) कुलगुरुंनी गठित केलेल्या तज्ज्ञ समितीने (पडताळणी समिती वगळून) व्यक्तीशः भेट देवून नवीन महाविद्यालयांसाठी संबंधित संस्थांनी विहित करण्यात आलेल्या मानकानुसार (संस्थेची स्वतःची इमारत, वर्ग खोल्या, अद्ययावत प्रयोगशाळा व संगणक कक्ष, सुसज्ज ग्रंथालय, विद्यार्थी/विद्यार्थीनींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृह, विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह, विद्यार्थ्यांसाठी क्रीडांगण, उपहारगृह इ.) तयारी केली आहे किंवा कसे याबाबत परीक्षण करून त्यांचा अहवाल 15 मार्च पर्यन्त कुलगुरुंच्या दर्जाच्या तज्ज्ञ समितीला सादर करण्यात येईल. सदर पायाभूत सोयीसुविधा पूर्ण न करणाऱ्या संस्थाची शिफारस समिती करणार नाही.

10) कुलगुरुंच्या दर्जाच्या समितीने मान्यता दिल्यानंतर कुलसचिवांमार्फत संबंधित संस्थांना 30 मार्च पर्यन्त L.O.A. (Letter of Approval) दिले जाईल.

11) L.O.A. ची मुदत 2 वर्षांपर्यत राहील.

12) L.O.A. नाकारलेल्या संस्था 15 एप्रिल पर्यन्त त्याविरुद्ध अपील दाखल करु शकतील. सदर अपीलावर सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्याकडून 30 एप्रिल पर्यंत निर्णय घेण्यात येईल.

13) L.O.A. प्राप्त झालेल्या संस्थांचे प्रस्ताव विद्यापीठाकडून शासनाकडे दिनांक 15 मे पर्यंत स्वीकारण्यात येतील.

14) विद्यापीठांकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर विद्यापीठ कायदा 1994 च्या कलम 82(5) मधील तरतूदीनुसार 15 जुलै पर्यन्त शासनाकडून परवानगी देण्यात येईल.

वरील सर्व बाबींची कृपया नोंद घ्यावी.

भवदीया,

स्वा/–

संचालक

विद्यापीठ नियोजन व विकास मंडळ